# खबरबात
## एप्रिल ते जून २०२३

उन्नती संस्था
सामाजिक आणि शैक्षणिक बदलासाठी




## मुलांच्या प्रगतीचा चढता आलेख

शैक्षणिक वर्षाच्या शेवटी मार्चमध्ये अकोला जिल्ह्यातील तीन शाळांमध्ये चालणाऱ्या साक्षरता व शिक्षण या उपक्रमांतर्गत चाचण्या घेण्यात आल्या. ही सर्व मुले कोविडच्या दोन वर्षांच्या अंतरा नंतर शिकत शिकणार होती. त्यांची इयत्ता दुसरी व तिसरी असली तरी, त्यांची पहिली पाटी कोरी होती, तरीही मुलांच्या प्रगतीचा आलेख उंचावलेला आहे.

- ६६ टक्के मुलांनी ७५ ते ९९ टक्के गुण मिळवले.
- १२ टक्के मुलांनी ५० ते ७४ टक्के गुण मिळवले.
- १० टक्के मुलांनी ३५ ते ५० टक्के गुण मिळविले.
- १० टक्के मुलांमध्ये मात्र सुधारणा करण्यासाठी विशेष लक्ष देण्याची गरज दिसून आली.
- २ टक्के मुले चाचणीच्या वेळी गैरहजर होती.

अंतिम चाचणीमध्ये मुलांच्या वाचन कौशल्य क्षमता समजल्या. यामध्ये मुलांना जोड्या लावा, रिकाम्या जागा-पर्याय देऊन व पर्याय न देऊन दोन्ही पद्धतीने मुलांनी सोडविल्या. वाक्य आकलन क्षमतेत मुले एका वाक्यात उत्तरे देवू लागलीत. (लेखी आणि तोंडी) लेखन कौशल्यात येण्यासाठी मात्र सर्वच मुलांचा सराव घेण्याची गरज आहे.

## शहापूर - आश्रमशाळांमध्ये साक्षरता वर्गाचे यश

शहापूर डीएसएस यश- शहापूर येथील आश्रम शाळांतील विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर कोविड महामारीचा परिणाम दिसून आला. त्यामुळे उन्नतीने पुणे येथील 'डोअर स्टेप स्कूल' या संस्थेच्या मदतीने ऑनलाइन साक्षरता वर्ग चालवला. यामध्ये तालुक्यातील तीन आश्रम शाळांमधील ९६ अप्रगत मुलांची निवड शिक्षकांच्या संमतीने करण्यात आली होती. दिवाळी नंतर हे साक्षरता वर्ग सुरू करण्यात आले. अवघ्या ८० ते ९० दिवसांमध्ये या वर्गातील ९६ मुलांपैकी सुमारे ८४ टक्के मुली-मुलांनी प्रगती केली. पैकी सुमारे १७ मुलांची वाचन क्षमता पूर्ण झाली, तर सुमारे १३ टक्के मुले स्थलांतरित झाल्याने वर्षअखेर चाचणीस उपस्थित राहू शकली नाहीत, यामध्ये एका विद्यार्थ्यावर अजून काम करण्याची आवश्यकता आहे.



# अकोट - कामाचा आढावा देण्यासाठी शिक्षक सभा

अकोटमधील कोरकू बहुल जातीमंधील जिल्हा परिषदांच्या शाळांमध्ये उन्नती संस्था काम करते, हे काम शिक्षकांना कळावे, त्यांची मते / विचार घ्यावे या उद्देशाने वर्षातून दोन ते तीन वेळा शिक्षक सभा घेतली जाते. यंदा २०२२-२३ या शैक्षणिक वर्षातील मुलांच्या अंतिम चाचणीचा निकाल व संस्थेच्या सहामाही कामाचा आढावा देण्याकरिता १३ एप्रिल २०२३ या तारखेला शिक्षक सभा घेण्यात आली. अकोला जिल्ह्यातील डांगरखेड, खिरकुंड खुर्द, खिरकुंड बु. आणि जनुना या चार जिल्हा परिषद शाळांमधील एकूण आठ शिक्षक या सभेत उपस्थित होते. मुलांना शिक्षणाच्या प्रवाहात आणण्यासाठी आवश्यक त्या महत्वाच्या घटकांवर चर्चा झाली.



# सर्वेक्षणे

## गाव सर्वेक्षण

अकोट तालुक्यातील जनुना, कोहा,खिरकुंड खुर्द या तीन नवीन गावांमध्ये गाव वाचनालय सुरु करण्याचा निर्णय घेतल्यावर तेथे गाव सर्वेक्षण केले गेले. यात प्रामुख्याने गावातील महिला, पुरुष, मुले, मुली यांची वयोगटानुसार माहिती घेण्यात आली. साक्षरतेची स्थिती लक्षात घेऊन योग्य स्तराची, स्तरानुसार पुस्तकांची संख्या, देवघेव करण्यासाठी लोकसंख्येनुसार गावाचे विभाग अशा विविध बाबी ठरविण्यासाठी या सर्वेक्षणाचा उपयोग होईल. या निमित्ताने उन्नती संस्थेची व गाव वाचनालय या उपक्रमाची माहिती प्रत्यक्ष पद्धतीने घराघरात पोहचविता आली.

## भाषिक सर्वेक्षण

उन्नती संस्था काम करत असलेल्या अकोटमधील खिरकुंड खु., खिरकुंड बु., डांगरखेड, जनुना या शाळांमध्ये ७ ते ११ वयोगटातील एकूण १२५ मुलांसोबत भाषिक सर्वेक्षण करण्यात आले. शाळेत असलेला मुलांचा समाज व त्यांची बोलली जाणारी भाषा हे जाणून घेण्यासाठी सदर सर्वेक्षण करण्यात आले.

त्याचे निष्कर्ष:

- अनुसूचित जमातीच्या मुलांचे प्रमाण - ९४ टक्के.
- घरात कोरकू भाषा बोलणारी मुले - ८३ टक्के.
- मराठी अजिबात बोलता न येणारी मुले - २६ टक्के
- थोड्या प्रमाणात मराठी भाषा बोलता येणारी मुले - ६६ टक्के.

वरील निष्कर्ष असले तरी शाळेय शिक्षण मराठी भाषेत दिले जाते आणि शिक्षकही केवळ मराठी भाषाच बोलतात, हा उन्नती संस्थेचा अनुभव आहे. शिक्षकांना कोरकू भाषेचे शिक्षण दिल्यास किंवा त्यांनी कोरकू भाषा शिकून घेतल्यास शिकविण्याच्या व शिकण्याच्या प्रक्रियेतील अडचणी दूर होतील असे दिसते.

# शहापूर - मुख्याध्यापकांसोबत नियोजन सभा

या वर्षी आश्रमशाळांमध्ये उन्नती संस्थेचे काम कसे असेल, शाळांचा सहभाग कुठे आवश्यक या बाबत चर्चा करण्यासाठी संबंधित शाळेतील मुख्याध्यापकांची उन्नती संस्थेच्या कार्यालयात  २५ जून २०२३ रोजी मुख्याध्यापक सभा घेण्यात आली. यावेळी सहा आश्रमशाळांतील सहा मुक्याध्यापक उपस्थित होते.
यावर्षी संस्था ५ वी आणि ६ वीच्या  वर्गांसाठ। काम सुरू करणार आहे याची कल्पना  शिक्षकांना देण्यात आली. शिक्षकांनी प्रत्येकी १ तासाचा वेळ व वर्गखोली उपलब्ध करून देण्याची शाश्वती दिली. शिक्षकांनी त्यांच्या उन्नती संस्थेकडून अपेक्षित असलेल्या सहकार्याबाबत सूचन। मांडल्या.  उन्नती संस्थेच्या कामाची शाळांमध्ये असलेली गरज शिक्षकांनी देखील अधोरेखीत केली. ही सभा उत्साहात आणि नवीन नियोजनांची आखणी करत पार पडली.



# मुलींनी चालवले गाववाचनालय

युथ लीडरशीप आणि जीवन कौशल्याचा भाग म्हणून शेणवे कुल्हे आश्रमशाळेतील १४ मुलींनी सहा गावांमध्ये मे महिन्याच्या सुट्टीत  गाव वाचनालयाचा प्रकल्प चालवला. संबंधित गावांपैकी अनेक गावे ही दुर्गम भागामध्ये आहेत. जिथे अन्य सुविधा खूप प्रयत्नांती पोहोचतात. तिथे गावातील या मुलींना वाचनालय चालवण्यासाठी समिश्र प्रतिसाद मिळाला. या मुलींचे कुटुंबीय आणि गावातील मोठ्या व्यक्तींकडून त्यांचे कौतुक झाले. मुलींमध्ये देखील लोकांशी संवाद साधणे, आपला मुद्दा पटवून सांगणे इत्यादी कौशल्ये  आहेत का हे चाचपडून पाहता आले. या दरम्यान या मुली गावातील सुमारे १५०  लोकांपर्यंत पुस्तके घेऊन पोहचल्या.



# उन्नती संस्थेच्या कार्याची प्रदर्शनी



-उन्नतीचे काम लोकांपर्यंत पोहोचावे, कामातील विचारांविषयी लोकांशी चर्चा व्हावी या उद्देशाने दिनांक ३० एप्रिल २०२३ रोजी ४ ते ९ या वेळेत उन्नती संस्थेने वार्षिक दिनाचे आयोजन केले होते. यामध्ये उन्नती संस्थेच्या सर्व कामांच्या फोटोंची प्रदर्शनी लावली होती. ठाणे येथील रहेजा गार्डन संकुलात झालेल्या या कार्यक्रमात सुमारे १०० जण सहभागी झाले होते.





उन्नती संस्थेचे काम अकोला व ठाणे जिल्ह्यातील आदिवासी भागात सुरु आहे. साक्षरता विकसन, शालेय व गाव वाचनालय हे उन्नती संस्थेचे प्रमुख कार्यक्रम आहेत. हे कार्यक्रम प्रामुख्याने सरकारी शाळांमध्ये तसेच गावकऱ्यांसोबत चालतात.

## कोरकू भाषा अभ्यासवर्ग

प्राथमिक स्तरावरील अध्ययन अध्यापनात शिक्षकांना मुलांची भाषा बोलता येणे, समजणे गरजेचे असते. शिक्षक व विद्यार्थी यांच्यात संभाषण वाढावे, शिक्षकांनी मुलांच्या मातृभाषेचा स्वीकार करावा हेही गरजेचे असते. कोरकू ही मराठीपेक्षा भिन्न भाषा असल्याने ती ऐकून ऐकून शिकणे अवघड जाते, हे लक्षात घेऊन उन्नती संस्थेने कोरकू भाषा शिकवण्याचा कोर्स तयार केला. यंदा हा कोर्स अकोट तालुक्यातील शिक्षकांसाठी खुला केला. यामध्ये ३५ शिक्षकांनी नोंदणी सुद्धा केली.

# कर्मचारी प्रशिक्षण / सक्षमीकरण

**एप्रिल ते जूनच्या मध्यान्हपर्यंत शाळांना सुट्टी असते; त्यामुळे या काळात कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण व विविध संस्थाना भेटी आयोजित करण्यात येतात. त्यानुसार यंदादेखील खालीलप्रमाणे काही भेटी आणि प्रशिक्षणे आयोजित करण्यात आली होती.**

कर्मचाऱ्यांची १७ दिवसांची १० विषयांवर प्रशिक्षणे झाली. यातील काही निवासी होती, तर काही अनिवासी होती. प्रशिक्षणाचे विषय पुढीलप्रमाणे होते - साक्षरता शिक्षण, कार्यक्रमाचे संनियंत्रण व मूल्यमापन, कला प्रशिक्षण, गोष्ट सांगणे/वाचणे/लिहिणे, आपले मन:स्वास्थ्य, केस स्टोरी लेखन, फोटो कसे काढावेत, गुगल ड्राईव्हचा वापर, प्रशिक्षणात अकोला व शहापूर संघातील (१५) सदस्य उपस्थित होते.





### लिंगभाव प्रशिक्षण

लिंगभाव आणि अधिकार या विषयासंबंधित 'वाचा' या संस्थेच्या वतीने घेण्यात आलेल्या कार्यशाळेत शहापूर व अकोला येथून प्रत्येकी एक कार्यकर्ती सहभागी झाली होती. शिक्षण या विषयात काम करताना लिंगभाव समानतेचा अंतर्भाव हा दृष्टिकोन समृध्द होण्यासाठी उन्नती संस्थेच्या वतीने या कार्यकर्तीना पाठविण्यात आले होते.

## पुणे येथील विविध संस्थांना भेटी

पुणे येथील डोअर स्टेप स्कूल, स्वाधार, खेळघर या संस्थादेखील मुलांसाठी साक्षरता, जीवन कौशल्य वाचनालय असे विविध विषय हाताळून काम करीत आहे. त्यांचे वरील विषयांच्या अनुषंगाने चाललेले कार्य , त्यासाठी आवश्यक ते लागणारे नियोजन व त्यातून तयार होणाऱ्या सर्व नोंदी उन्नती संस्थेला उपयुक्त ठरतील या कारणास्तव त्यांचा अभ्यास करण्यासाठी उन्नती संस्थेचे अकोट येथील १० कार्यकर्ते तर, शहापूर येथील ६ कार्यकर्ते आणि पुणे व मुंबहून प्रत्येकी १ कार्यकर्ती याविविध संस्थांच्या भेटी दरम्यान उपस्थित होते. याभेटी दरम्यान या सर्व संस्थांची वाचनालय व्यवस्थापन व्यवस्था, नियोजन प्रक्रिया, साधने व प्रत्यक्ष वर्ग पाहिले गेले आणि चर्चा झाल्या. अकोला येथील एका गटाने तीन दिवस वर्षा पुरंदरे यांच्याबरोबर साक्षरता या विषयावर चर्चा केली. या चर्चेचा वापर कोरकू-मराठी अभ्यासक्रमासाठी करता येईल असे ठरले.



# विविध उपक्रमांचा वार्षिक आढावा

जिल्हा परिषद शाळा व आश्रमशाळा यांमध्ये चालणारे उन्नती संस्थेचे वर्ग एप्रिल ते जून या कालावधीत बंद असतात. त्यामुळे याच काळात वर्षभरातील कामांचा सर्वंकष आढावा घेतला जातो. या वर्षी देखील अकोट येथे चालणारे शिकू आनंदे, वाचू आनंदे वर्ग व गाव वाचनालय तसेच शहापूर येथील आफिर, वृक्षारोपण आणि पर्यावरण शिक्षण या कार्यक्रमांचा आढावा डोंबिवली येथे घेण्यात आला. त्याचा इतिवृत्तांत पुढील प्रमाणे-

**शिकू आनंदे-** (बहुभाषिक शिक्षण दृष्टिकोनावर आधारित साक्षरता व शिक्षण कार्यक्रम – वर्ग १ ते ३ साठी)

**वाचू आनंदे-** (शालेय वाचनालय कार्यक्रम – वर्ग ४ ते ६ साठी)

**गाव वाचनालय** - (अकोट येथील चार आदिवासी गावांमध्ये चालणारा प्रकल्प)

अकोट मध्ये चालणाऱ्या या चार कार्यक्रमांची वार्षिक आढावा बैठक २४ ते २७ एप्रिल दरम्यान डोंबिवली येथील कार्यालयात पार पडली. त्यावेळी संस्थेचे संचालक, शहापूर व अकोला येथील कार्यकर्ते तसेच सर्व समन्वयक उपस्थित होते. या बैठकीमध्ये पुढील वर्षाच्या कार्यक्रमाचे उद्देश व स्वरूप ठरविण्यात आले.





## वृक्षारोपण आणि संवर्धन
## १ एप्रिल २०२३

या बैठकीसाठी कार्यक्रमाचे संचालक, कार्यक्रमाची अमल बजावणी करणारे कार्यकर्ते, संस्थेचे ट्रस्टी, अन्य सहकारी आणि याच विषयात ठाणे जिल्ह्यात काम करणाऱ्या दोन संस्थाचे कार्यकर्ते देखील उपस्थित होत्या. या वर्षी कोणत्या अपेक्षेने काम केले व पुढील वर्षी कामाची दिशा काय ठेवावी, त्यातील उपक्रम काय असावेत याबद्दल सविस्तर नियोजन झाले.



## पर्यावरण शिक्षण
## २७ फेब्रु. २०२३

या बैठकीसाठी कार्यक्रमाची अमलबजावणी करणाऱ्या पाच जणांचा संघ, उन्नतीच्या प्रमुख हेमांगी जोशी तसेच अन्य काही कार्यकर्ते उपस्थित होते. पुढील वर्षीच्या पर्यावरण शिक्षण कार्यक्रमाचे स्वरूप ठरवले गेले आणि त्यासाठी निधी उभा करण्याबाबत चर्चा झाली.



# दादा मला पण दे पुस्तक !

माहे जानेवारी २०२३ पासून कोहा या गावात उन्नती संस्थेचे गाव वाचनालय सुरू झाले. यामध्ये दारोदारी जाऊन वाचकांना त्यांच्या आवडीची पुस्तके पुरविण्याचे प्रयत्न 'पुस्तक मित्र' करत असतात.
स्वत:च्या आई-वडिलांना पुस्तक मित्रांकडून पुस्तकं देता व घेताना, वाचत असताना बघून लहान मुलांच्या मनात सुद्धा पुस्तक हाताळण्याची, पुस्तकातील चित्र बघण्याची इच्छा निर्माण होऊ लागली. "मलापण पुस्तक पाहिजे, मला पण पुस्तक द्या ना!" असा हट्ट लहान मुले पालकांजवळ करू लागली. लहान मुलांना वाचता येत नाही; त्यामुळे यांना कशाला हवी पुस्तकं? म्हणून मोठी लोक सुद्धा मुलांकडे दुर्लक्ष करत होती. पुस्तकांसाठी मुलांचा असणारा आग्रह एक दिवस पुस्तक मित्रांच्या कानावर पडला.



पुस्तक मित्राने मुलांशी संवाद केला असता, "मला पण पुस्तक दे दादा" असे मुलं म्हणू लागली. मुलांच्या आग्रहाने चित्रांची काही चित्रयुक्त पुस्तके पुस्तक मित्र घेऊन गेले व मुलांना वाचण्यासाठी दिली. हळूहळू मुले आई-वडिलांना आग्रह न करता पुस्तक मित्र दादालाच पुस्तकांची मागणी करू लागली. हळूहळू मुलांना पुस्तकांची सवय लागली व आवड निर्माण झाली. आता दादा ज्या दिवशी पुस्तक घेऊन गेला, त्यादिवशी दादा दुरून दिसला तरीही संध्या, ईश्वरी, नैना, सोनू यांसारखी मुले धावत दादा जवळ येतात व पाहिजे ते पुस्तक दादाजवळून घेतात.

**OUR BANKER:**
PUNJAB NATIONAL BANK, M. G. ROAD, THANE (WEST) MAH. 400602

**ACCOUNT NAME:**
UNNATI INSTITUTE FOR SOCIAL AND EDUCATIONAL CHANGE

**SAVINGS AC NO.:**
3739 0001 0064 2890

**IFSC :** PUNB0373900

**QR CODE FOR DONATIONS:**

**YOU MAY ALSO DONATE IN TWO INSTALMENTS IN A YEAR.**


उन्नती संस्था
सामाजिक आणि शैक्षणिक बदलासाठी

**पत्ता- उन्नती संस्था, ४०२, निसर्ग कृपा,
सुयोग मंगल कार्यालयाजवळ, टिळक नगर,
डोंबिवली पूर्व, ४२१२०१**

unnati.isec@gmail.com

9892103371

https://www.facebook.com/UNNATIFOREDUCATION?mibextid=ZbWKwL